# विदर्भाच्या कृषी विकासाला दिशा देणार 'ॲग्रोव्हिजन'

## १० ते १३ नोव्हेंबरपर्यंत रेशीमबागेत आयोजन

## ना. गडकरींच्या हस्ते 'ॲप'चे लाँचिंग

*प्रतिनिधी/२३ सप्टेंबर*

**नागपूर :** परंपरागत शेतीमुळे हवालदिल शेतकऱ्यांना नव्या तंत्रज्ञानाची, पर्यायी पूरक धंद्यांची अद्ययावत माहिती देत विदर्भातील कृषी विकासाची नवी दिशा येत्या १० ते १३ नोव्हेंबरदरम्यान रेशीमबाग मैदानावर आयोजित ९ व्या 'ॲग्रोव्हिजन' कृषी प्रदर्शन देईल असा विश्वास या प्रदर्शनाचे मुख्य प्रवर्तक, केंद्रीय परिवहन व जलसंसाधन मंत्री नितीन गडकरी यांनी आज पत्रपरिषदेत व्यक्त केला. यावेळी ॲग्रोव्हिजनच्या माहितीपर 'ॲप'चे लाँचिंग करण्यात आले. भविष्यात या ॲपवर शेतकऱ्यांना उपयुक्त माहिती मिळू शकेल.

या प्रदर्शनाचे उद्घाटन उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत ना. गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली होणार असून विविध राज्यातील कृषिमंत्री, उद्योजक, लाखो शेतकरी यात सहभागी होणार आहेत. उद्घाटन सोहळा मनपातर्फे नवनिर्मित सुरेश भट सांस्कृतिक सभागृहात होणार आहे. कार्यशाळा




प्रदर्शनस्थळीच होतील. यंदा ११ ते १३ नोव्हेंबरदरम्यान विविध विषयांवरील मान्यवरांच्या ३० कार्यशाळा होणार आहेत. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवरील चारशेवर कृषीविषयक कंपन्या, संशोधन संस्था, नवउद्योजक, शेतकरी संशोधक, वित्तसंस्था, कृषी विद्यापीठे, शेतीशी संबंधित शासकीय विभाग, सेवा पुरवठादार आदींचा सहभाग यात असणार आहे. विदर्भासह मध्य भारतातील प्रगतीशील शेतकरी, व्यावसायिकांशी कृषी तज्ज्ञांचा थेट संवाद यावेळी होईल. यावेळी स्वतंत्र पशुधन दालन उभारण्यात येणार आहे. यात विविध प्रकारचे जातीवंत पशुधन अभ्यासाची संधी शेतकऱ्यांना मिळू शकेल. नवीन पिके, पीक व्यवस्थापन, दुग्ध व्यवसाय, कुक्कुट पालन, मत्स्य व मधमाशी पालन तसेच प्रथमच बांबू लागवड व यातील संधी आदी शेती पूरक व्यवसायांना प्रोत्साहन देणारे तज्ज्ञांचे चर्चासत्र होणार आहेत. विदर्भात दुग्धविकासाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना शाश्वत प्रगतीची मोठी संधी असल्याने यावेळी स्वतंत्र विदर्भ दुग्धविकास परिषद होणार आहे. यासोबतच कृषी क्षेत्रातील विद्यार्थी, शेतकरी यांच्या शेतातील नवसंशोधन व नाविण्यपूर्ण प्रयोगांना *(उर्वरित वृत्त पान ७ वर)*